# अधिसुचना

क्र.टिडी/टे-५/बुलेट ट्रेन/कलम-१९(२)/
नोटिफिकेशन/२०२०
उपविभागीय अधिकारी ठाणे उपविभाग ठाणे
यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी ठाणे कार्यालय
इमारत, २ रा मजला, कक्ष क्र.२१७, कोर्ट नाका,
ठाणे.
दि. २०/०८/२०२०.

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी ठाणे यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसुचना क्र.उजि/भूसं(समन्वय)/मु.अ.हा.रे./प्रारूप अधिसुचना/कावि-८६५/२०१९ दि.२८/८/२०१९ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोन मध्ये वर्णन केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये जिल्हाधिकारी यांची कामे करण्यासाठी समुचित सरकारने पदनिर्दिष्ट केलेला कोणताही विशेष अधिकारी हा जिल्हाधिकारी म्हणून कर्तव्य बजावणेस सक्षम असून, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ङ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्यपार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी ठाणे, उपविभाग ठाणे यांस पदनिर्देशीत केले आहे.

त्याअर्थी अनुसुची १ मध्ये दर्शविलेल्या जमीनीबाबत कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये प्राप्त हरकतीवर विचार केल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत समुचित शासन यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (२) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले बाधीत कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी याव्दारे पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विर्निदिष्ट केला आहे.

## अनुसूची — एक
## जमिनीचे वर्णन
### मौजे बेतवडे, ता.ठाणे, जि.ठाणे

| अ.क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | ७४/८ | ०-०४-१३ |
| २ | ७४/६ | ०-००-३२ |
| ३ | ९२/१ | ०-०३-४० |
| ४ | ६१/२ | ०-१८-१९ |
| ५ | ६१/१ | ०-००-६५ |
| ६ | ७३/१ | ०-००-४६ |
| ७ | ७३/२ | ०-१३-४१ |
| ८ | ६३/१ | ०-०५-६० |
| ९ | ६३/२ | ०-००-७९ |
| १० | ७२/९ | ०-०६-३८ |
| ११ | ६५/२ | ०-०३-४० |
| | **एकुण** | **०-५६-७३** |

### मौजे आगासन, ता.ठाणे, जि.ठाणे

| अ.क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १५/१अ | ०-००-०४ |
| २ | १५/२ ब | ०-०३-१३ |
| ३ | १९६/१ | ०-०१-४९ |
| ४ | १९६/२ | ०-०९-७० |
| ५ | १७०/अ | ०-२७-६० |
| ६ | १७०/ब | |
| ७ | १७/४ अ | ०-१०-९२ |
| ८ | १७/४ ब | ०-०५-७५ |
| ९ | १७/५ | ०-००-१७ |
| १० | १७/६ | ०-००-०१ |
| ११ | १७/७ | ०-०४-८० |
| १२ | १७/८ | ०-०१-६८ |
| १३ | १७/९अ | ०-०४-५२ |
| १४ | १९४ | ०-००-२२ |
| १५ | १९१ | ०-००-६२ |
| १६ | १८/२/१ | ०-०३-७८ |
| १७ | १८/२/२ | |
| १८ | १८/२/३ | |
| १९ | १७४ | ०-२०-१८ |
| २० | २० | ०-०४-४५ |
| २१ | २२/३ अ | ०-२०-११ |

| | | |
|---|---|---|
| २२ | २३/३ | ०-००-१८ |
| २३ | २३/५ | ०-०२-१७ |
| २४ | २४/३ | ०-०४-८० |
| २५ | २४/५/अ | ०-१७-२६ |
| २६ | २४/५/ब | ०-०६-२० |
| २७ | २४/५/क | |
| २८ | २४/७ | ०-००-११ |
| २९ | २६ | ०-१७-३५ |
| ३० | १९/१ | ०-००-२६ |
| | **एकुण** | **१-६७-५०** |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| **प्रकल्पाचे नाव** | **नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनचे बुलेट ट्रेन प्रकल्प.** |
|---|---|
| प्रकल्पाच्या कामाचे वर्णन | नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनचे बुलेट ट्रेन प्रकल्प हा एकुण ५०८.१०कि.मी. चा प्रकल्प असुन त्यापैकी १५५.६४२ कि.मी.लांब इतका रेल्वेमार्ग महाराष्ट्र राज्यामधून जातो. महाराष्ट्र राज्यातील या अंतरामध्ये चार स्थानके (बांद्रा-कुर्ला संकुल, ठाणे, विरार व बोईसर) नियोजित केले आहेत. केंद्रशासीत प्रदेश दादरा आणि नगर हवेली मध्ये ४.३० कि.मी व गुजरात मध्ये ३४८.०४ कि.मी इतका आहे. |
| समाजाला होणारे लाभ<br>(आर्थिक रोजगार पायाभूत सुविधा सोयी सुविधा याबाबत व इतर लाभा संबंधात) | नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनचे बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे जलदगती रेल्वेप्रकल्प बांधकाम करणे, त्याचा वापर करणे व देखभाल करणे याकामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराच्या संधी मिळतील.<br>तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकष विकास, मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती पर्यावरण स्थिरता हया बाबी अभिप्रेत आहेत. |

## नुसूची-तीन

पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन

ता. ठाणे जि. ठाणे

| **अ.क्र.** | **गावाचे नाव** | **भूमापन क्रमांक किंवा गट नंबर** | **अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | आगासन | १७/९ अ | ४ |
| २ | बेतवडे | ७४/६ | १ |
| ३ | बेतवडे | ६३/१ | १ |
| ४ | बेतवडे | ७२/९ | १ |
| | **एकुण** | | **७** |

## अनुसूची – चार

## (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

मौजे बेतवडे व आगासन ता. जि.ठाणे येथील एकूण क्षेत्र २-२४-२३ हे.आर. **नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी संपादन होत आहे. कोणीही खातेदार विस्थापित होत नसल्याने पुर्नवसन व पुर्नवसाहत करणेचा प्रश्न उदभवत नाही.** तथापि भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या तरतुदीला अधिन राहुन नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लि. यांनी खालीलप्रमाणे रक्कमा व सोयीसुवीधा अनुसूचि-एक व अनुसूचि-तीन मध्ये नमुद केलेल्या बाधीत व्यक्तींसाठी जाहिर केलेले आहेत.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>नुकसान भरपाईचा तपशिल</th></tr>
<tr><td rowspan="5">१</td><td>१.भारतीय मुद्रांक कायदा १८९९ च्या तरतुदीनुसार जमीनीच्या विक्रीसाठी ठरविण्यात आलेले बाजारमुल्य<br>किंवा<br>मागील तीन वर्षातील त्या गावातील किंवा नजीकच्या गावातील झालेले खरेदीखतांपैकी उच्चत्तम ५०% खरेदीखतातील सरासरी नुसार येणाऱ्या रक्कमेपैकी उच्चत्तम रक्कम.</td></tr>
<tr><td>२. कायद्याच्या तरतुदीनुसार ठरविणेत आलेल्या गुणांकानुसार त्या पटीने रक्कम</td></tr>
<tr><td>३. बांधकामाची किंमत व त्यावर १००% सोर्ल्यशियम</td></tr>
<tr><td>४. अधिसूचना प्रसिध्द झालेपासुन १२% व्याज.</td></tr>
<tr><td>५. अंशत: संपादित जमीनीचे बाबतीत शिल्लक राहिलेल्या क्षेत्रासाठी खालील प्रमाणे वाढीव सहाय्य अनुज्ञेय राहील.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शिल्लक क्षेत्र</th><th>वाढीव सहाय्य</th></tr>
<tr><td>१</td><td>५०% पर्यंत</td><td>निरंक</td></tr>
<tr><td>२</td><td>५१% ते ७५% पर्यंत</td><td>नुकसान भरपाईच्या दराच्या १५% रक्कम</td></tr>
<tr><td>३</td><td>७५% वरील</td><td>नुकसान भरपाईच्या दराच्या २५% रक्कम</td></tr>
</table></td></tr>
<tr><td rowspan="6">२</td><td>निर्वाह भत्ता</td></tr>
<tr><td>१. पुनर्वसन व पुनर्वसाहतीसाठी रुपये ०५ लाख.</td></tr>
<tr><td>२. रुपये ३६०० प्रती महा प्रमाणे एक वर्षाचे भाडे एकुण रुपये ४३२००/-</td></tr>
<tr><td>३. वाहतुकीचा खर्च रुपये ५००००/-</td></tr>
<tr><td>४. निर्वाहाची रक्कम रुपये ५००००/-</td></tr>
<tr><td>५. नवीन जमीन अथवा घर खरेदी केलेली असल्यास त्यासाठी खर्च करणेत आलेल्या मुद्रांक शुल्क व नोंदणी खर्चाचे कागदोपत्री पुरावे तीन वर्षाचे आत सादर केल्यास सदर रक्कमेचा परतावा.</td></tr>
</table>

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशांचे उपविभागीय अधिकारी ठाणे उपविभाग ठाणे व नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई या कार्यालयात निरिक्षण करता येऊ शकेल.

दिनांक :- २०/ ०८ /२०२०

ठिकाण :- ठाणे

**सही/-xxx**

**(अविनाश शिंदे)**

**उपविभागीय अधिकारी**

**ठाणे उपविभाग ठाणे**